अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 15 जानेवारी 2026 | वर्ष 11 वे | अंक 22 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# नगर पालिकेचा स्वच्छता कारभार कचऱ्यात!

## स्वच्छता कर्मचारी कपातीमुळे ब्रम्हपुरी शहरात दुर्गंधीचा विळखा; प्रशासनाविरुध्द संतापाची लाट

ब्रह्मपुरी/का.प्र.

एकीकडे 'स्वच्छ भारत' अभियानाच्या वल्गना केल्या जात असताना, ब्रह्मपुरी नगर परिषदेने मात्र स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या संख्येत मोठी कपात करून शहराला कचरा आणि दुर्गंधीच्या विळख्यात ढकलले आहे. नाली आणि गटार स्वच्छ करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या निम्मी केल्याने शहरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले असून, नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या प्रशासकीय धोरणांविरोधात आता संताप व्यक्त होत आहे.

ब्रह्मपुरी शहराचा विस्तार, लोकसंख्या आणि व्यावसायिक संकुले झपाट्याने वाढत आहेत. अशा वेळी स्वच्छता यंत्रणा अधिक सक्षम करणे गरजेचे असताना, नगर परिषदेने २०२२-२३ पासून अनाकलनीय निर्णय घेत कर्मचाऱ्यांची संख्या ५० वरून थेट ३५ वर आणली आहे. यामुळे शहरातील सांडपाणी वाहिन्या तुडुंब भरल्या असून ठिकठिकाणी सांडपाणी रस्त्यावर येत आहे.



या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी राहुल भोयर, ॲड. आशिष गोंडाने आणि रवी पवार यांनी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. निवेदनात प्रशासनावर कडक शब्दांत ताशेरे ओढण्यात आले आहेत. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ नुसार नागरिकांना स्वच्छ वातावरण देणे हे नगर परिषदेचे बंधनकारक कर्तव्य आहे. मात्र, नागरिक नियमित कर भरूनही त्यांना अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे. ठिकठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे डेंग्यू, मलेरिया आणि गॅस्ट्रोसारख्या साथीच्या आजारांची टांगती तलवार

(उर्वरित पान क्र. ६ वर)

### नूतन नगराध्यक्ष यांच्यापुढील आव्हान

**शहर अस्वच्छतेच्या विळख्यात असताना, या परीस्थितीतुन मार्ग काढण्याचे आव्हान नव नियुक्त नगराध्यक्ष, उपाध्यक्ष व नगरसेवकापुढे उभे ठाकले आहे. नागरिकांना त्यांच्याकडून फार मोठ्या अपेक्षा असून ही परीस्थिती कसे हाताळतात, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.**

# ब्रम्हपुरी तालुक्यातील लोहार डोंगरी जंगल खाणीच्या विळख्यात

## खाणीला पर्यावरणप्रेमींचा तीव्र विरोध

ब्रह्मपुरी/का.प्र.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील अतिसंवेदनशील वन्यजीव कॉरिडॉरमध्ये प्रस्तावित असलेल्या लोहखनिज खाणीला राज्य सरकारने हिरवा कंदील दाखवला आहे. राज्य वन्यजीव मंडळाच्या तज्ज्ञ सदस्यांनी या प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला असतानाही, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या प्रकल्पाचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे. यामुळे ताडोबा-नवेगाव-नागझिरा या वाघांच्या नैसर्गिक भ्रमणमार्गाला (कॉरिडॉर) मोठा धोका निर्माण झाला असून भविष्यात मानव-वन्यजीव संघर्ष अधिक तीव्र होण्याची भीती व्यक्त होत आहे.

**नेमका प्रकल्प काय आहे?**

ब्रह्मपुरी तालुक्यातील लोहारडोंगरी गावापासून १५ किमी अंतरावर असलेल्या काचेपार राखीव जंगलात (कक्षा क्र. ४३९) हा प्रकल्प प्रस्तावित आहे. एका खासगी पोलाद कंपनीने २०१९ मध्ये लिलावात मिळवलेल्या या ३६ हेक्टर समृद्ध वनजमिनीत आता खुल्या पद्धतीने लोहखनिजाचे उत्खनन केले जाणार आहे.



जिल्ह्यात दरवर्षी सरासरी ५० निष्पाप ग्रामस्थांचा वाघांच्या हल्ल्यात जीव जात आहे. वाघ-मानव संघर्षावर उपाययोजना करण्याऐवजी, सरकार लोहारडोंगरी खाणीला परवानगी देऊन हा संघर्ष अधिक तीव्र करत आहे. केवळ ३२ कायमस्वरूपी नोकऱ्यांचे गाजर दाखवून १८ हजार झाडे तोडणे आणि वाघांचे भ्रमणमार्ग बंद करणे म्हणजे दरवर्षी वाघांच्या हल्ल्यात मृत्यूचे शतक पूर्ण करण्याचाच हा प्रकार आहे, अशी घणाघाती टीका इको-प्रो संस्थेचे अध्यक्ष तथा राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाचे माजी सदस्य बंडू धोतरे यांनी केले आहे.

सरकारने जनतेचे रक्षण करणे अपेक्षित आहे. मात्र, सरकार त्याऐवजी धोकादायक खाणींना परवानगी देत आहे. यामुळे वाघ-मानव संघर्ष वाढेल. ताडोबा ते लोहारडोंगरी वनक्षेत्रातून वाघांचे उत्तरेकडे आणि पूर्वेकडे होणारे नैसर्गिक स्थलांतर थांबेल. वनविभागाकडून संघर्ष कमी करण्याचे प्रयत्न आणि सरकारकडून देण्यात येणारी संघर्ष भरपाईची रक्कम खाणीच्या प्रस्तावित फायद्यांपेक्षा जास्त असल्याचे अहवालात नमूद आहे.

**सरकारचा 'बचाव' आणि नवीन अभयारण्याची घोषणा :**
वनविभागाचे अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी सांगितले की, 'खाणीला मंजुरी दिली असली तरी संवर्धनासाठी आम्ही सकारात्मक आहोत. वन्यजीवांसाठी 'घोडाझरी टू एकारा' हा ३५ हेक्टरचा नवा अभयारण्य क्षेत्र लवकरच घोषित केला जाणार आहे.'




नियमित वाचा
अर्धसाप्ताहिक
ब्रम्हपुरी समाचार

## संपादकीय...

# 'विकसित भारत'चा फुगा फुटणार?

पुढील महिन्यात देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन या सलग दहाव्यांदा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करून इतिहास घडवतील, पण हा इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल की जनतेच्या अश्रूनी, हा प्रश्न आज देशाच्या प्रत्येक घरात विचारला जात आहे. कारण सत्ताधारी सरकार ज्या थाटात 'विकसित भारत'चे ढोल बडवत आहेत. त्याचवेळी देशाची अर्थव्यवस्था मात्र आतून कमकुवत, नाजूक आणि अस्थिर होत चालली आहे. सरकार ७.४ टक्के विकासदराचा गजर करत आहे. पण हा विकास कुणासाठी ? देशातील ८० कोटी लोकांना वर्षभर मोफत धान्य द्यावे लागते, याचाच अर्थ देशातील प्रचंड मोठी लोकसंख्या अजूनही दोन वेळच्या भाकरीसाठी सरकारवर अवलंबून आहे. हीच का 'विश्वगुरू' होण्याची लक्षणे ?

बेरोजगारी हा आज देशातील सर्वात मोठा स्फोटक प्रश्न बनला आहे. तरुणांच्या हातात पदव्या आहेत, पण नोकऱ्या नाहीत. दुसरीकडे झोमॅटो-स्विगीच्या 'गिग इकॉनॉमी'तून काहींच्या पोटापुरती व्यवस्था होत असली, तरी त्याला ना सुरक्षितता आहे, ना भविष्य. कायमस्वरूपी रोजगाराची हमी देणारी कोणतीही धोरणे सरकारकडे नाहीत. मागील बजेटमध्ये मध्यमवर्गाला करसवलती देऊन सरकारने स्वत:ची पाठ थोपटून घेतली. त्यानंतर जीएसटी कमी केल्याचा जल्लोष केला. पण दिवाळीत काय झाले? लोकांनी उधळपट्टी केली नाही. उलट खर्च आवरता घेतला. याचा अर्थ स्पष्ट आहे की, लोकांच्या खिशात पैसा नाही, भविष्याबाबत भीती आहे आणि सरकारच्या 'अच्छे दिन'च्या घोषणांवर विश्वास उरलेला नाही. रस्ते, रेल्वे, वीज प्रकल्प, बंदरे या पायाभूत सुविधांवर प्रचंड गुंतवणूक चालू आहे, असे सरकार म्हणते. हे सगळे खरे असेलही. पण खासगी गुंतवणूक कुठे आहे ? उद्योगपती गुंतवणूक करत नाहीत, उलट देश सोडून जात आहेत. गेल्या काही वर्षांत लाखो श्रीमंतांनी भारताला रामराम ठोकून परदेशी नागरिकत्व घेतले आहे. हे सरकारच्या आर्थिक धोरणांवरील अविश्वासाचे मोठे प्रमाणपत्र नाही तर काय ? नवीन योजना आणायला सरकारकडे पैसा नाही, आणि छापील नोटांच्या जोरावर अर्थव्यवस्था चालवली तर महागाईचा भडका उडेल. आधीच सामान्य माणूस महागाईने होरपळतो आहे. केंद्र सरकारचा जास्त भर योजनांपेक्षा त्याच्या जाहिरातींवर आहे. काम कमी आणि प्रचार जास्त हीच सध्याची अवस्था आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवरही परिस्थिती गंभीर आहे. थेट परकीय गुंतवणूक झपाट्याने बाहेर चालली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारताला सातत्याने डिवचत आहेत. रशियाकडून तेल घेणाऱ्या देशांवर ५०० टक्के कर लावण्याची धमकी दिली जात आहे. अमेरिकेबरोबर व्यापार करार झाला नाही, तर भारताला मोठा आर्थिक धक्का बसेल, हे उघड सत्य आहे. सरकार म्हणते भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. पण आयएमएफसारख्या संस्था प्रश्न विचारत आहेत. रोजगार का वाढत नाही? लोकांची क्रयशक्ती का घटते आहे? आकडेवारीत पारदर्शकता का नाही ? ०१ फेब्रुवारीला रविवारी बजेट सादर होणार आहे. कदाचित हा इतिहासातील पहिलाच रविवारचा अर्थसंकल्प असेल. पण देशाला सुट्टीच्या दिवशी स्वप्ने दाखवण्यापेक्षा, आठवड्याच्या सातही दिवशी भाकर मिळेल अशी व्यवस्था हवी आहे.

निर्मला सीतारामन यांच्या पोतडीतून यावेळी जादू निघाली नाही, तर 'विकसित भारत'चा फुगा फुटायला वेळ लागणार नाही. कारण देशाची अर्थव्यवस्था सध्या प्रगतीच्या रस्त्यावर नाही, तर कडेलोटाच्या उंबरठ्यावर उभी आहे.

ब्रम्हपुरी समाचार अंक नियमित वाचनाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या वेबसाईटवर लॉगीन करा...

# ने.हि. महाविद्यालयात वादविवाद व गीतगायन स्पर्धा

ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात दि. ३० व ३१ डिसेंबर २०२५ रोजी अनुक्रमे वादविवाद व गीत गायन स्पर्धा महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी 'प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, डॉ. राजेंद्रकुमार डांगे यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्यात.

'कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) भविष्याकरिता तारक की मारक?' या विषयावर विद्यार्थ्यांनी आपली साधक-बाधक मते मांडली. या स्पर्धेमध्ये एकूण २० विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग दर्शवला. वादविवाद स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक समीक्षा प्रकाश पंडित, व्दितीय पारितोषिक कु.जागृती भजभुजे, तर उत्तेजनार्थ बक्षीस




कशिश ठाकरे हिने पटकावले. या समयी परीक्षक म्हणून डॉ.युवराज मेश्राम, डॉ.रतन मेश्राम, प्रा.राहुल मोहुर्ले उपस्थित होते. संचालन प्रा. जयेश हजारे तर उपस्थिताचे आभार प्रा. कृतिका बोरकर यांनी मानले. दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांकरिता गीतगायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. भावगीत, देशभक्तीपर गीत, मराठी चित्रपट गीते, अभंग गाऊन विद्यार्थ्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या स्पर्धेमध्ये एकूण ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शवला. गीतगायन स्पर्धेचे प्रथम पारितोषिक सुधीर देशमुख, व्दितीय पारितोषिक कु. गायत्री राऊत व उत्तेजनार्थ बक्षीस अर्जुन वदनलवार याला मिळाले.

विद्यार्थ्यांचे परीक्षण डॉ.मिलिंद पठाडे, प्रा. कोमल ठोंबरे, प्रा. प्रियंका उईके यांनी केले. तर संचालन डॉ. नीलिमा रंगारी व आभार प्रदर्शन प्रा. ओजस्वीनी बावनकुळे यांनी केले. या दोन्ही स्पर्धेच्या यशस्वीतेकरिता सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. पद्माकर वानखडे, प्रा. जयेश हजारे व अन्य सर्व समिती सदस्यांनी मोलाची भूमिका बजावली. या दोन्ही स्पर्धेला बहुसंख्य विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली.

# ब्रम्हपुरीत नॉयलॉन मांजा विक्रेत्याच्या दुकानावर धाड

ब्रह्मपुरी/का.प्र.

शहरातील एका डेली निड्समधून नायलॉन मांजा जप्त




करण्यात आला. दुकानातून ३५ हजारांचा साठा ताब्यात घेण्यात आला. याप्रकरणी दिलीप गजपुरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्यात नायलॉन मांजा विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. असे असले तरी प्रशासनाच्या डोळयात धूळ फेकून नायलॉन मांजाची विक्री करण्यात येते. ब्रम्हपुरीतील बालाजी वॉर्डात ओमकार डेली निड्स या दुकानातून नायलॉन मांजाची विक्री केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी दिलीप रामचंद्र गजपुरे यांच्या ओमकार डेली निड्स दुकानाची तपासणी केली. या तपासणीत दुकानात नायलॉन मांजाचा मोठा साठा आढळून आला. दुकानातून ३५ हजार रुपयांचा साठा ब्रह्मपुरी पोलिसांनी ताब्यात घेतला. याप्रकरणी दिलीप गजपुरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक मुमका सुदर्शन, अप्पर पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी दारासिंग राजपूत, पोलिस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनोज खडसे, हवालदार मुकेश गजबे, नीलेश तुमसरे, इर्शाद खान, स्वप्नील पळसपगार, वशिष्ठ रंगारी, प्रवीण भिवगडे यांनी केली आहे. पुढील तपास हवालदार मुकेश गजबे करीत आहे.

## तालुकास्तरीय नवरत्न स्पर्धा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नांदगाव जानी येथे तालुकास्तरीय नवरत्न स्पर्धा नुकत्याच संपन्न झाले. या स्पर्धेचे उदघाटन चंद्रपूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष कृष्णा शहारे यांचा हस्ते, तर अध्यक्षस्थानी सरपंच प्रवीण बांडे उपस्थित होते.

या तालुकास्तरीय स्पर्धेत तालुक्यातून अकरा केंद्रातील १८६ स्पर्धक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे संचालन बोदले यांनी केले.

## विनोदिनी

मच्छर (मच्छरी से) - डार्लिंग कल में तुम्हारे लिये... शेर का शिकार कर के लाऊँगा...
मच्छरी - ठीक है, अब सो जाओ...
मच्छर - डार्लिंग कल में हाथी को कहूँगा और उसका सारा खून तुम्हारे लिये लेकर आऊँगा....
मच्छरी - अच्छा अब सो जाओ....
मच्छर - शायद तुम मुझ पर भरोसा नहीं कर रही, चलो कल में तुम्हें १०० तोले की चेन लाकर दूँगा...
मच्छरी - अब चैन से सोने भी दोगे या नहीं, कितनी बार कहा है कि, चुनाव में खड़े नेताओं को काटने के बाद घर मत आया करो...!!

# वार्षिक स्नेहसंमेलन 'कारवाँ'चा भव्य आणि प्रेरणादायी अविष्कार

## एल.एम.बी. पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरी : "शालेय विद्यार्थीनीचा एका स्वप्नवत यशापर्यंतचा प्रवास"






ब्रम्हपुरी/का.प्र.

०३ जानेवारी २०२६ रोजी एल. एम. बी. स्कुलचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा सोहळा आनंदात पार पडला. या वर्षीच्या कार्यक्रमाची संकल्पना होती 'कारवाँ : एका स्वप्नातून यशापर्यंतचा प्रवास'. या संकल्पनेतून एका जीज्ञासू मुलीचा जीवन परिचय एका कॅमेरा च्या माध्यमातून मांडण्यात आला. नेहा नावाचे पात्र तयार करून एक सुंदर अशा काल्पनिक कथेनूसार कारवाँ कार्यक्रम सादर केला.

कारवाँच्या मुख्य कल्पनेनुसार नेहा एक हुशार मुलगी होती. तिला आकाशातील तारे, चंद्र, उपग्रहाविषयी रूची होती. परंतु मध्येच कुठेतरी ती मोबाईलच्या आहारी जाउन अभ्यासात भरकटली. तेव्हा तिच्या शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनानुसार अभ्यासात तिची गोडी पुन्हा निर्माण होउन ती योग्य वळणावर आली. नंतर तिचा ISRO मध्ये जाणाच्या उद्देश ही यशस्वी झाला आणि तिच्या जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर ती एक यशस्वी अंतराळवीर झाली.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून सुरेल संगीतात्मक स्वागतगीताने करण्यात आली. त्यानंतर शास्त्रीय, लोकनृत्य तसेच आधुनिक नृत्य सादरीकरणातून मुलीच्या जीवनातील वेगवेगळे टप्पे प्रभावीपणे उलगडण्यात आले. कारवाँ या संकल्पनेतून, जगभरातील संस्कृतींचा प्रवास प्रभावीपणे सादर करण्यात आला. चीनच्या पारंपारिक संस्कृतीचे दर्शन घडवणारे शिस्तबध्द, जोशपूर्ण रंगबेरंगी पोशाखात ड्रॅगन नृत्य सादर करण्यात आले. रशियन लोकनृत्याच्या दमदार हालचाली, वेगवान पावले उर्जापूर्ण तालांनी रशियन संस्कृतीचा अनुभव दिला. नैसर्गिक हालचाली, पारंपारिक वेषभूषेने आफ्रिकेच्या जीवनशैलीचे प्रभावी चित्रण करण्यात आले. आधुनिक संगीत, स्ट्रिट डान्स व फि स्टाईल मधून अमेरिकेची आधुनिकता, आत्मविश्वास आणि उर्जेचे दर्शन घडले. कलर्स ऑफ इंडिया मधून भरतनाट्यम, कथक, भांगडा आणि देशभक्तीपर ताल यांच्या संगमातुन भारताची विविधता, संस्कृती आणि एकतेचा संदेश देण्यात आला. 'मॅजिक बुक ऑफ सर्कस' या अनोख्या सादरीकरणातून कल्पनाशक्तीचा जादुई प्रवास उलगडण्यात आला. एका जादुई पुस्तकातून उघडणारे सर्कसचे रंगीबेरंगी जग, हसरे चेहरे, थरारक हालचाली आणि नाट्यमय सादरीकरणाने प्रेक्षकांना बालपणीच्या आनंदात घेऊन गेले. उडान या सादरीकरणातून स्वप्नांना पंख देण्याचा संदेश देण्यात आला. संघर्ष अपयश आशेच्या पायऱ्या चढत स्वत:वर विश्वास ठेवून यशाच्या दिशेने झेप घेण्याची प्रेरणा या नृत्यनाट्यातून प्रभावीपणे मांडण्यात आली. 'रिदम ऑफ इंडिया' या सादरीकरणातून भारताची ओळखी उलगडण्यात आली. यात सरस्वती वंदना, कमळ व मोराच्या प्रतिकात्मक सादरीकरणातून भारताच्या राष्ट्रीय फुल आणि पक्षी सजीव स्वरूपात उभे केले. त्यातील सौंदर्य कोमलता आणि लयबध्द हालचालींनी प्रेक्षकांची मने जिंकली. हॉकी व वाघ या राष्ट्रीय खेळ व राष्ट्रीय प्राण्याच्या नृत्य सादरीकरणातून भारताची ताकद, शौर्य आणि आत्मविश्वास प्रभावीपणे मांडण्यात आला. सादरीकरणाचा भावनिक कळस ठरला तो 'वंदे मातरम' या देशभक्तीपर नृत्याविष्काराने विद्यार्थिनींच्या सादरीकरणातून मातृभूमीप्रती प्रेम, आदर आणि अभिमान प्रत्येक प्रेक्षकांच्या मनात रूजवण्यात आला.

या सर्व नृत्य सादरीकरणातून एका मुलीच्या स्वप्नांचा कारवाँ जगभर ज्ञान, संस्कृती आणि अनुभव गोळा करत अखेर ISRO मधील यशापर्यंत पोहचतो. हा विचार सुंदरपणे प्रकट करण्यात आला. आला. या कार्यक्रमातून 'स्वप्न बघा, मेहनत करा आणि ध्येय गाठा' हा महत्वाचा संदेश देण्यात आला.

या विविधांगी कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहूणे म्हणून ने.हि. शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती स्नेहलता भैया मॅडम, ने. हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, सदस्य गौरव भैया सर, पोलिस निरिक्षक बानबले सर, गुट्टे सर, अक्षय लड्ढा, जतीन राठी सर, सुनिता भैया मॅडम व तसेच शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, शाळेचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका यांच्यासह, शिक्षक व पालक बहुसंख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

# तालुक्यातील विकासकामांची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी ब्रह्मपुरी तालुक्यातील विविध विकासकामांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी व निरीक्षण केले. यावेळी ब्रम्हपुरीच्या उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, तहसीलदार सतीश मासाळ, तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ब्रह्मपुरी शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सध्या प्रगतीपथावर असून, कामामुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे निदर्शनास येताच जिल्हाधिकारी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित यंत्रणांनी तात्काळ काम पूर्ण करावे, तसेच धुळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशा स्पष्ट सूचना कार्यकारी अभियंता व संबंधित कंत्राटदारांना देण्यात आल्या.

यानंतर ब्रह्मपुरी ते आरमोरी रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाची पाहणी करण्यात आली. सदर काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी असमाधान व्यक्त करून, विहित कालमर्यादेत काम पूर्ण करण्याचे निर्देश कार्यकारी अभियंता (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण) जया ठाकरे, उपविभागीय अभियंता अजय चहांदे व संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना दिले. त्यानंतर उदापूर येथे माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये आग लागलेल्या इथेनॉल प्लांटला भेट देऊन झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यात आली. यावेळी सुरक्षा व्यवस्थेबाबत आवश्यक खबरदारी घेण्याबरोबरच, परिसरातील लगतच्या गावांतील नागरिकांच्या आरोग्याला कोणताही धोका निर्माण होणार नाही, यासाठी योग्य उपाययोजना करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

ब्रह्मपुरी तालुक्यात प्रस्तावित झुडपी जंगल प्रकरणासंदर्भात विविध गावांना भेट देऊन कामाची पाहणी करण्यात आली. मौजा गांगलवाडी येथील स्मार्ट पीएचसी तसेच बचत गटाच्या कार्यालयास भेट देण्यात आली. मेंडकी येथील बळीराजा पाणंद रस्ता, जि.प. प्राथमिक शाळा येथे सायन्स पार्क व मॉडेल स्कूलबाबत निरीक्षण करण्यात आले. तसेच बांबू लागवडीच्या कामाचीही पाहणी करण्यात आली.

# ने.हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरीच्या चिन्मयी मडावीला इंद्रधनुष्य २०२५ चे सुवर्णपदक



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील ने.हि. महाविद्यालयातील चिन्मयी चंद्रशेखर मडावी या विद्यार्थीनीला गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील अश्वमेघ व इंद्रधनुष्य २०२५ च्या उपक्रमात शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये सहभागी विद्यार्थ्यांमधून सर्वात जास्त प्राप्त गुण सी.जी.पी.ए. ८.२५ मिळाल्यामुळे कु.चिन्मयी सुवर्णपदकाची मानकरी ठरली आहे. नुकताच प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला. यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ धनराज खानोरकर, डॉ पद्माकर वानखडे उपस्थित होते.

तिच्या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्ष स्नेहलताताई भैया, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश भैया, सचिव अशोक भैया, सहसचिव ॲड. भास्कर उराडे, सदस्य गौरव भैया यांचेसह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन करुन तिला शुभेच्छा दिल्या आहेत.

# सावकारी पाशात अडकलेल्या रोशन कुळे यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे

## पालकमंत्री नाम. उईके, जिल्हाधिकारी विनय गौडा व आम. बंटी भांगडिया यांची प्रत्यक्ष भेट



नागभीड/प्रतिनिधी

सावकारी कर्जापायी स्वत:ची किडनी विकण्याची वेळ आलेल्या नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील पीडित शेतकरी रोशन कुळे यांची ०९ जानेवारी २०२५ रोजी राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री नाम. अशोकजी उईके यांनी प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. यावेळी प्रशासकीय यंत्रणेने आतापर्यंत केलेल्या कारवाईचा आढावा घेण्यात आला आणि पीडित कुटुंबाला पूर्ण न्याय देण्याचे आश्वासन देण्यात आले.

काही दिवसांपूर्वी रोशन कुळे यांनी अवैध सावकारीला कंटाळून आपली शेती, दोन ट्रॅक्टर, मोटारसायकल आणि सोने गमावल्याची हृदयद्रावक बातमी समोर आली होती. या प्रकरणाची गंभीर दखल घेत प्रशासनाने तातडीने सूत्रे हलवली आहेत. विकलेले दोन्ही ट्रॅक्टर ब्रह्मपुरी पोलिसांनी जप्त केले आहेत. संबंधित अवैध सावकारांची बँक खाती गोठवण्यात आली असून सोन्याचे दागिनेही जमा करण्यात आले आहेत. बेकायदेशीरपणे बळकावलेली शेतजमीन पुन्हा मूळ मालकाच्या (रोशन कुळे) नावावर करण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरू झाली आहे.

पालकमंत्र्यांच्या भेटीदरम्यान पीडित शेतकरी रोशन कुळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, 'अवैध सावकारांविरोधात तक्रार केल्यानंतर प्रशासन आणि शासन माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. मला न्याय मिळत असून मी सध्याच्या कारवाईवर समाधानी आहे. हा माझ्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे, त्यामुळे विनंती आहे की यात कुणीही राजकारण करू नये.'

या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान जिल्हाधिकारी विनयजी गौंड, अतिरिक्त पोलीस अधीक्षक कातकडे, उपविभागीय अधिकारी (SDO), तहसीलदार, गटविकास अधिकारी (BDO), तसेच पोलीस निरीक्षक आणि महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते. भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष प्रशांतजी वाघरे, गडचिरोली भाजप जिल्हाध्यक्ष रमेशजी बाळसागडे व नागभीड-ब्रह्मपुरी येथील पदाधिकारी व गावकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

### दोषींवर कठोर कारवाई होणार - पालकमंत्री व आमदार

**पालकमंत्री अशोकजी उईके यांनी स्पष्ट केले की, शासन स्तरावरून कायदेशीर रित्या सर्व मालमत्ता कुळे कुटुंबाला परत मिळवून दिली जाईल. यावेळी चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार श्री. कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडिया यांनीही विरोधकांना लक्ष्य करत आवाहन केले की, एका शेतकऱ्याच्या परिस्थितीचे भांडवल करून कोणीही राजकारण करू नये. दोषींवर कडक कारवाई करण्यात आली असून प्रशासन पीडिताला पूर्णतः सावरण्यासाठी प्रयत्नशील आहे.**

# मनोज भूपाल सतत लोककार्यात व्यस्त असणारे कार्यकर्ते

## डॉ. पंजाबराव देशमुख कॉन्व्हेंटमध्ये स्नेहसंमेलन

## प्रा. प्रकाश बगमारे



ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी नगरपरिषदेच्या २०२५ ला संपन्न झालेल्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस यांच्यामध्ये तुल्यबळ लढत झाली. परंतु काही चुकांमुळे ब्रह्मपुरी नगरपरिषदेवर भारतीय जनता पक्षाची सत्ता येऊ शकली नाही. भारतीय जनता पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा केली परंतु यश त्यांचे पासून पुढे गेले. परंतु या पडझडीमध्ये सुद्धा ओबीसी समाजाचे आणि ब्रह्मपुरीकरांच्या सेवेमध्ये सदैव पुढे असणारे माजी नगरसेवक आणि चंद्रपूर जिल्हा भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हा महामंत्री व विद्यमान ब्रह्मपुरी शहर भाजपाचे महामंत्री मनोज भूपाल यांनी अपेक्षेप्रमाणे विजयी प्राप्त केला आणि ब्रह्मपुरी भाजपाची लाज राखली. मनोज भुपाल हे सतत कार्यशील असतात आणि जातीपातीचा विचार न करता ब्रह्मपुरी शहरातील सर्वांना आपली सेवा उपलब्ध करून देतात, असे विचार प्रा. प्रकाश बगमारे यांनी व्यक्त केले.

ते श्री श्रावणजी बगमारे शिक्षण संस्था ब्रह्मपुरी द्वारा संचालित डॉ पंजाबराव देशमुख कन्या कनिष्ठ महाविद्यालय आणि डॉ पंजाबराव देशमुख कॉन्व्हेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ०३ जानेवारी २०२६ च्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी स्नेहसंमेलन प्रसंगी संस्था अध्यक्ष आणि भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव प्रा प्रकाश बगमारे बोलत होते. यावेळी मनोज भूपाल यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना भविष्यात यापेक्षा मोठे यश प्राप्त व्हावे यासाठी शुभेच्छा देत त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. प्रा प्रकाश बगमारे, संस्था उपाध्यक्ष तथा प्राचार्य मनीषाताई बगमारेआणि संस्थेचे सदस्य पदाधिकारी प्रा डॉ शंतनूदादा बगमारे यांचे शुभ हस्ते त्यांना शुभेच्छा देत शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कॉलेजच्या प्राचार्य शारदाताई ठाकरे, पत्रकार गोवर्धन दोनाडकर, जयघोष सहारे, सुपरवायझर नीलिमा गुंजेवार आणि पालक व विद्यार्थी उपस्थित होते. संचालन ठाकरे मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन भारती पिलारे यांनी केले.

# नेवजाबाई हितकारिणी विद्यालयातील शिक्षक जयंत पराते यांचा नवोपक्रम राज्यस्तरावर पात्र



ब्रह्मपुरी/का.प्र.

राज्यातील नवोपक्रमशील शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात. अध्यापन अधिक प्रभावी, रंजक व परिणामकारक व्हावे, तसेच विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्या शैक्षणिक समस्या सोडविण्याच्या उद्देशाने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे, महाराष्ट्र यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेच्या जिल्हास्तरीय द्वितीय फेरीतून नेवजाबाई हितकारिणी विद्यालय, ब्रह्मपुरी येथील शिक्षक श्री. जयंत पराते यांची राज्यस्तरासाठी निवड करण्यात आली आहे.

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेमध्ये जयंत पराते यांनी 'क्वेश्चन ऑफ द डे' या विषयावर अत्यंत प्रभावी व कौशल्यपूर्ण सादरीकरण केले. त्यांच्या या नवोपक्रमाची राज्यस्तरावरील प्राथमिक उत्कृष्ट नवोपक्रमांमध्ये निवड झाल्याने विद्यालयासह संपूर्ण तालुक्याला गौरव प्राप्त झाला आहे.

या उल्लेखनीय यशामुळे नेवजाबाई हितकारिणी विद्यालयाचे नाव जिल्हा पटलावर पुन्हा एकदा उज्वलपणे कोरले गेले आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव अशोकजी भैया, विद्यालयाचे मुख्याध्यापक नाईक सर, उपमुख्याध्यापक नाकाडे सर, पर्यवेक्षक जीभकाटे सर तसेच समस्त शिक्षकवृंद यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# राजमाता जिजाऊ व विवेकानंद जयंती

## महाराष्ट्र इंस्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेटाळाचा उपक्रम



ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला, ब्रम्हपुरी येथे दि.१२ जानेवारीला महाविद्यालयात राजमाता जिजाऊ यांची ४२८ वी आणि स्वामी विवेकानंद यांची १६३ वी जयंती साजरी करण्यात आली. या वेळेस प्राचार्य डॉ. सचिन दुधे, प्रा.श्रीकांत महाजन प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

या प्रसंगी महाविद्यालयीन परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त फार्मा युथ वीक फेस्टिवल चे आयोजन १२ जानेवारी ते १९ जानेवारी २०२६ दरम्यान करण्यात आले आहेत, यात प्रामुख्याने प्रश्न मंजुषा, वाद विवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, गेस्ट लेक्चर, महाविद्यालयीन परिसर स्वच्छता तसेच आरोग्य दक्षता रॅली चे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे.

# ब्रम्हपुरी नगर पालिकेत काँग्रेसचे वर्चस्व

## डॉ. नितीन उराडे यांची न.प.च्या उपाध्यक्षपदी वर्णी



ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत निर्भेळ यश संपादन केल्यानंतर, काँग्रेस पक्षाने सत्तास्थापनेचा पुढचा टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला. शुक्रवार, ९ जानेवारी रोजी पार पडलेल्या विशेष सभेत डॉ. नितीन उराडे यांची नगर परिषद उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. याच सोहळ्यात नवनियुक्त स्वीकृत नगरसेवकांचाही पदग्रहण व स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

नगर पालिकेच्या २०२६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाने नगराध्यक्षपदासह २१ जागांवर विजय मिळवून स्पष्ट बहुमत प्राप्त केले आहे. या विजयानंतर शुक्रवारला दुपारी १ वाजता नगर परिषद कार्यालयात नगराध्यक्ष योगेश मिसार यांच्या अध्यक्षतेखाली उपाध्यक्ष निवडीची प्रक्रिया पार पडली. सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांच्या उपस्थितीत डॉ. नितीन उराडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. उपाध्यक्ष निवडीसोबतच, नगर परिषदेच्या अनुभवी फळीत पुष्पाकर श्रीहरी बांगरे आणि वकार इसराईल खान यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड करण्यात आली. या दोन्ही नेत्यांच्या निवडीमुळे शहराच्या विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. नगराध्यक्ष योगेश मिसार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या समारंभाला काँग्रेसमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी सदर कार्यक्रमाला ब्रम्हपुरी नगर पालिकेच्या मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे ह्या उपस्थित होत्या. पदग्रहण समारंभाला मान्यवर व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष योगेश मिसार म्हणाले की, 'जनतेने काँग्रेस पक्षावर आणि आमच्या पॅनेलवर जो विश्वास दाखवला आहे, त्याला आम्ही तडा जाऊ देणार नाही. डॉ. नितीन उराडे यांच्या रूपाने एक अभ्यासू उपाध्यक्ष परिषदेला मिळाले आहेत. स्वीकृत नगरसेवकांच्या अनुभवाचा उपयोग शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केला जाईल.' नवनियुक्त उपाध्यक्ष डॉ. नितीन उराडे यांनी आपल्या निवडीबद्दल पक्षाचे आभार मानले आणि शहरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. या निवडीबद्दल संपूर्ण शहरात काँग्रेस कार्यकर्त्यांनी फटाक्यांच्या आतषबाजीत, गुलालाची उधळण करत जल्लोष साजरा केला.

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती



ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतातील स्त्री शिक्षणाच्या जननी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती ०३ जानेवारी २०२६ रोजी शनिवारला एल. एम. बी. पब्लिक स्कुल ब्रम्हपुरी येथे साजरी करण्यात आली.

सवित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील नायगाव येथे झाला. या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका व समाजसुधारक होत्या. त्यांनी १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात मुलीसाठी पहिली शाळा उघडली तसेच शिक्षणातून सामाजिक विषमता दूर करण्याच्या प्रयत्न केला. जात-पात अस्पृश्यतेविरुद्ध आवाज उठवला. बालहत्या प्रतिबंधक गृह आणि रात्रशाळा स्थापन करण्यातही महत्वाचे योगदान दिले. एवढेच नाही तर यांनी 'चूल आणि मुल' या पारंपारिक विचारांना आव्हान देत चूल मुल आणि शिक्षण असा नवा विचार समाजात रूजवला आणि भारतीय स्त्रीवाद व शिक्षण क्रांतीचा पाया रचला त्यामुळे यांना क्रांतीज्योती म्हणून आदराने स्मरणात ठेवले जाते.

याप्रसंगी स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रतिमेला पुष्प अर्पण करून जयंती साजरी केली.

# सेवानिवृत्त मुख्याध्यापकांचा सपत्निक सत्कार सोहळा

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुका मुख्याध्यापक संघातर्फे ब्रह्मपुरी तालुक्यातील वेगवेगळ्या शाळेत



कार्यरत सेवानिवृत्त मुख्याध्यापकांचा सत्कार सोहळा शुक्रवारी ०९ जानेवारी रोजी नेवजाबाई हितकारणी विद्यालयात दुपारी १ वाजता संपन्न झाला. या सत्कार समारंभाला अध्यक्ष म्हणून जे.के. ठाकरे उपाध्यक्ष चंद्रपूर जिल्हा मुख्याध्यापक संघ उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून व्ही. एस. तोंडरे मुख्याध्यापक ज्ञानगंगा विद्यालय बेटाळा तथा अध्यक्ष मुख्याध्याक संघ ब्रह्मपुरी. एस.जी.हटवार नितीन विद्यालय अडयाळ तथा सचिव मुख्याध्यापक संघ ब्रह्मपुरी, एम के नाईक मुख्याध्यापक नेवजाबाई हितकारणी विद्यालय ब्रह्मपुरी, ओमप्रकाश बगमारे मुख्याध्यापक महाराष्ट्र विद्यालय पिंपळगाव (भोसले) आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

याप्रसंगी लालाजी दादाजी नगारे, गंगाधर हिरामण पिलारे, तुकडुदास गोविंदराव चाचरकर, बाबा महादेव नगराळे, भोजराज केशवराव भैसारे यांचा सेवानिवृत्त मुख्याध्यापक संघातर्फे सपत्नीक सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन धनंजय दाते, तर मान्यवरांचे आभार मंगल धोटे यांनी मानले.

# ज्ञानोपासक विद्यालयात स्नेहसंमेलन तथा विद्यार्थी स्नेह मिलन सोहळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

ज्ञानोपासक विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय निलज येथे दिनांक ५ व ६ जानेवारी २०२६ ला स्नेहसंमेलन तथा माजी विद्यार्थी स्नेह मिलन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दि. ५ जानेवारीला स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रमोदजी चिमूरकर यांचे हस्ते पार पडले. स्नेहसंमेलनानिमित्त विधीध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ६ जानेवारी २०२५ ला माजी विद्यार्थी स्नेहमिलन सोहळा संपन्न झाला. माजी विद्यार्थी स्नेह मिलन मेळाव्याचे उद्घाटक प्रदीपजी बुराडे धान्य व्यापारी निलज, सह उदघाटक चंद्रकांत हजारे पाचगाव, अध्यक्ष गुरुदेव ठाकरे रुई, सह अध्यक्ष, मा. गोवर्धन दोनाडकर पत्रकार देशोन्नती, उपाध्यक्ष हेमंत मैंद यांच्यासह माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

### ... QUOTES ...

"Confidence and hard work is the best medicine to kill the disease called failure. It will make you a successful person."
- Dr. APJ Abdul Kalam

# रनमोचन येथे भागवत ज्ञानदान सप्ताहाचा समारोप कार्यक्रम



ब्रह्मपुरी/का.प्र.

रनमोचन येथे बुधवार, दिनांक ०७ जानेवारी २०२६ रोजी ज्ञानदान भागवत सप्ताहाचा समारोप कार्यक्रम पार पडला. सात दिवस चाललेल्या ज्ञानदान भागवत सप्ताहात कथानकांचे यशस्वी वाचन वाचन हरिभक्त परायण बाळकृष्ण तलमले महाराज यांच्या अमृततुल्य वाणीतून झाले. प्रसंगी ब्रम्हपुरी तालुका काँग्रेस अध्यक्ष खेमराज तिडके, डॉ. गोकुळदास बालपांडे, पुरुषोत्तम पत्रे, पत्रकार गोवर्धन दोनाडकर, गवारकर साहेब, चौरु दोनाडकर, मनोज मैंन्द, सरपंच नीलीमा राऊत, सदाशिव ठाकरे, संजय प्रधान, घनश्याम मेश्राम, अश्विनी दोनाडकर, कोमल मेश्राम, मंदा सहारे, अस्मिता पिलरे, दादाजी पिलारे व गावकरी उपस्थित होते.

### चारोळी

बायको आली तीर्थयात्रा करून
तिने माझ्यासाठी आणला दासबोध...
खरं तर याची गरज काय होती,
दास बनून तिचा ऐकतच होतो बोध...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

Nevjabai Bhaiya Hitkarini Education Society's

**LMB Public School, Bramhapuri**

**Tah. Bramhapuri Dist. Chandrapur**

Affi.No. 1130674 Govt. Recognized No. 3068.2014

Udise No. : 27131111830 Mob.No. 7083840564

**WE'RE HIRING** [JOIN OUR TEAM]


Applications are invited for the following posts at LMB Public School (Self-finance, CBSE School) Bramhapuri till 17th Jan. 2026, 12 noon in school office. Applications won't be accepted after this date.

| Sr. No. | Name of Post | Requirement | Qualification |
|---|---|---|---|
| 1. | Primary Teacher (PRT) and Trained Graduate Teacher (TGT) | English | Graduation/M.A. Eng. + B.Ed. |
| | | Science | M.Sc./B.Sc. + B.Ed. |
| | | Maths | M.Sc./B.Sc. + B.Ed. |
| | | Social Study | Graduation + B.Ed. |
| | | Computer | BCA/MCA. B.Ed. |
| 2. | Councellor | Psychologist | B.A./M.A./P.Phil. Psychology |
| 3. | Special Educator | Trainer | Post Graduate, Rehabilitation With 6 months cert./Bachelor Degree + 6 Months with special Needs course. |
| 4. | Drawing & Art/Craft | Art/Craft | BFA/MFA |

Experienced persons will be preferred. The Candidate must submit all relevant certificates & Mark sheets along with recent passport size photograph. Candidates can also submit their resume on Email ID : lmbpublicschool@gmail.com

President Mr. A.K. Bhaiya | Director Dr. Ashita G. Bhaiya | Principal Mr. K.W. Qureshi





**Miracle constructions & Developers**

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर

मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.





प्रो.प्रा. सुरेश सोरते

मो. 8698323337

**सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स**

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर

नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट

स्टिलचे नावे बनवून मिळेल.




# नगर पालिकेचा स्वच्छता कारभार...

(पान क्र. १ वरून)

नागरिकांच्या डोक्यावर आहे.

शहराच्या विस्तारानुसार स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या तातडीने ११० करण्यात यावी.शहराचे झोनमध्ये विभाजन करून प्रत्येक झोनसाठी किमान ५ कायमस्वरूपी कर्मचारी नियुक्त करावेत.स्वच्छता कामाची केवळ निविदा न काढता, त्याची नियमित देखरेख आणि जबाबदारी निश्चित करण्यात यावी ह्या प्रमुख निवेदनातील प्रमुख मागण्या आहेत.'नगर परिषद प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या संख्येत केलेली कपात हा लोकशाहीतील जनहितविरोधी निर्णय आहे. जर प्रशासनाने तातडीने कर्मचारी वाढवून स्वच्छता सुधारली नाही, तर आम्हाला तीव्र आंदोलनाचा आणि उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल,' असा इशारा निवेदनकर्त्यांनी दिला आहे.

❀❀❀❀❀❀

# राष्ट्रीय चर्चासत्रात ने.हि. विद्यालयाचे मुख्याध्यापक कपूर नाईक यांनी केले नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापक कपूर नाईक यांनी राष्ट्रीय शालेय नेतृत्व विकास चर्चासत्रात चंद्रपूर जिल्ह्यातून नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करत शाळेच्या शैक्षणिक लौकिकात मानाचा तुरा रोवला आहे.

दिनांक २ ते ४ जानेवारी दरम्यान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलाताबाद तालुक्यातील नांद्राबाद येथे हे राष्ट्रीय स्तरावरील शालेय नेतृत्व विकास चर्चासत्र संपन्न झाले. या चर्चासत्राचे आयोजन महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (MIEPA), छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले होते. या राष्ट्रीय चर्चासत्रास दिल्ली येथील निपा (NIPA) च्या कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच शिक्षण संचालक श्री. कृष्णकुमार पाटील, विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अनिल साबळे, प्रादेशिक विद्या प्राधिकरणाच्या उपसंचालिका डॉ. शैलजा दराडे, प्राचार्य डॉ. आर. डी. कांबळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

या चर्चासत्रामध्ये महाराष्ट्रातील ७२ निवडक मुख्याध्यापक, तसेच राजस्थान, मध्यप्रदेश, गोवा व इतर केंद्रशासित प्रदेशांतील मिळून सुमारे ९० मुख्याध्यापकांनी सहभाग नोंदविला. चर्चासत्रात शालेय नेतृत्व कौशल्ये, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी, प्रशासनातील नाविन्यपूर्ण उपक्रम, विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धती यावर सखोल व मार्गदर्शक चर्चा करण्यात आली. या प्रसंगी मुख्याध्यापक नाईक यांनी आपल्या विद्यालयात राबविण्यात येणारे शैक्षणिक उपक्रम, गुणवत्ता सुधारणा प्रक्रिया तसेच शाळा प्रशासनातील अनुभव राष्ट्रीय पातळीवर प्रभावीपणे मांडले. 'शाळेचे वैभव व शैक्षणिक कार्य राष्ट्रीय पातळीवर सादर करता आले, ही संपूर्ण विद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे,' असे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

याबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया तसेच संस्थेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी मुख्याध्यापक कपूर नाईक यांचे अभिनंदन केले. सोबतच शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही त्यांच्या कार्याचा गौरव केला.

## ब्रम्हपुरीच्या नमिताची सहा. गटविकास अधिकारी पदावर निवड

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षा २०२४ मध्ये



ब्रम्हपुरी येथिल ने.हि. उच्च माध्यमिक विद्यालयातील से.नि.शिक्षक शामसुंदर खाडीलकर यांची मुलगी नमिता खाडीलकर हिची सहायक गटविकास अधिकारी या राजपत्रित पदावर निवड झाली आहे. तिने ने. हि. कन्या विद्यालय ब्रम्हपुरी येथे इयत्ता १० वी पर्यतचे शिक्षन पूर्ण केले. तिच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.




Lubi PUMPS·MOTORS

बुधवार बंद

- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

**गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी**

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान

1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404